नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०६/२०२५ (सोमवार)**

---

## एन.डी.पी.एस. च्या गुन्हयातील पाहीजे आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दिनांक ०४/०५/२०२५ रोजी गोन्ही शिवारातील उड्डान पुला खाली स्थाानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गांजा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर धाड टाकली असता आरोपी नामे १) आनंद देवशंकर वर्मा वय ३० वर्ष व २) गोलु वर्मा दोन्ही रा. वार्ड क्र ०१ येरला हे अंमली पदार्थ गांजा ताब्यात बाळगून विक्री करतांना प्रत्यक्ष मिळून आले. आरोपी क्रं. २ गोलू वर्मा हा पोलीसांना पाहून घटनास्थळावरून पळून गेला. सदर प्रकरणी **कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस कायदयान्वये अपराध क्र ३७०/२०२५ दाखल झाला आहे. यातील पाहीजे आरोपी नामे गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा ,रा. येराळा, वार्ड क्रं १,ता. कळमेश्वर हा गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हता. तसेच खापरखेडा पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस कायदयान्वये दाखल अप क्र ३०५/२०२५ मध्ये नमुद आरोपीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले होते.**

**स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण सदर पाहीजे आरोपी नामे गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा ,रा. येराळा, वार्ड क्रं १,ता. कळमेश्वर याचा शोध घेत होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने , दिनांक ३०/०५/२०२५ रोजी गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने आरोपी नामे नामे गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा , वय ३३ वर्षे, रा. येराळा, वार्ड क्रं १, ता. कळमेश्वर याला हिंगणघाट जि. वर्धा येथुन ताब्यात घेतले. कळमेश्वर पोलीसांनी आरोपीला अटक केली आहे. आरोपी सध्या पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे.**

# अवैधरित्या रेतीची चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद
## मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा**:—दिनांक ०१/०६/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गौण खनीज रेतीचे उत्खनन करून वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई कं. १ :**—पोलीसांना माहीती मिळाली की, कन्हान नदीच्या पात्रात पानमारा शिवारातील डोंगर घाटामध्ये एक इसम ट्रक्टरच्या ट्रॉली मध्ये घमेला पावडयाच्या सहायाने रेती भरीत आहे. मिळालेल्या माहीतीवरून मौदा पोलीस तात्काळ पानमारा शिवारातील डोंगर घाटामध्ये गेले असता तेथे एक आयसर कंपनीचा ट्रक्टर मुंडा व निळया रंगाची ट्रॉली एम.एच ४० सी.क्यु २६६८ हे दिसुन आले. एक इसम त्यामध्ये फावडयाने रेती भरीत होता.नमुद इसमाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव. **शुभम भगवान सोनेकर वय २८ वर्षे रा. कोटगांव मौदा जि. नागपूर** असे समजले. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच तो स्वत:च ट्रक्टरचा चालक व मालक असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१) एक आयसर कंपनीचा ट्रक्टर मुंडा व ट्रॉली एम.एच ४० सी.क्यु २६६८ किंमती ६,००,०००/रूपये व २) १ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये आणि असा एकुण ६,०५,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**कारवाई कं. २ :**—पोलीसांना माहीती मिळाली की, सांड नदीच्या पात्रात एक इसम ट्रक्टरच्या ट्रालीमध्ये घमेला फावडयाच्या सहायाने रेती भरीत आहे. मिळालेल्या माहीतीवरून मौदा पोलीस तात्काळ घटनास्थळी गेले असता तेथे एक आयसर कंपनीचा ट्रक्टर ला विना क्रमांकाचे ट्रक्टर आणि ट्रॉली दिसुन आले. एक इसम त्यामध्ये फावडयाने रेती भरीत होता.नमुद इसमाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव. **अंकीत गुलाबराव वैदय, वय २७ वर्षे, रा. नवेगांव, मौदा जि. नागपूर** असे समजले. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच तो स्वत:च ट्रक्टरचा चालक व मालक असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१) एक आयसर कंपनीचा विनाक्रमांकाचे ट्रक्टर मुंडा व ट्रॉली किंमती ६,००,०००/—रूपये व २) १ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये आणि असा एकुण ६,०५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**दोन्ही कारवाईत एकुण** १२,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद **आरोपीविरूध्द** पोलीस स्टेशन मौदा येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल केले आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद २२ जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०१/०६/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तारसा शिवारात तारसा जॉईंट येथे कन्हान कडे जाणारा रोड वर तात्काळ नाकाबंदी करून खालीलप्रमाणे कारवाई केली.

**कारवाई कं १ :—** नाकाबंदी दरम्यान तारसाकडुन **एक टाटा झेनॉन गाडी क्र एम.एच ३७ टी २५८९** येतांना दिसली सदर वाहन चालकाला थांबविण्याचा इशार केला असता वाहन चालकांने पोलीसांना पाहुन अंधाराचा फायदा घेत वाहन काही अंतरावर थांबवुन पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये **१२ गोवंश जनावरे** दिसुन आले. नमुद जनावरांना चारपाण्याची कोणतीही सोय न करता, निर्दयते कोंबुन जनावरांची वाहतुक केली जात असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष एक टाटा झेनॉन गाडी क्र एम.एच. ३७ टी २५८९ किंमती ६,००,०००/— रूपये. व १२ गोवंश जनावरे किंमती १,२०,००० /— रूपये **एकुण किंमती ७,२०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई कं २ :—** नाकाबंदी दरम्यान टाटा झेनॉन **गाडी क्र एम.एच गाडी क्र एम.एच. २९ बी.ई. ५३६७** येतांना दिसली सदर वाहन चालकाला थांबविण्याचा इशार केला असता वाहन चालकांने पोलीसांना पाहुन अंधाराचा फायदा घेत वाहन काही अंतरावर थांबवुन पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये **१० गोवंश जनावरे** दिसुन आले. नमुद जनावरांना चारपाण्याची कोणतीही सोय न करता, निर्दयते कोंबुन जनावरांची वाहतुक केली जात असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष टाटा झेनॉन गाडी क्र एम.एच गाडी क्र एम.एच

२९ बी. ई. ५३६७ किंमती ६,००,०००/— रूपये. व १० गोवंश जनावरे किंमती १,००,००० /— रूपये एकुण **किंमती ७,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाईत एकुण २२ जनावरांची सुटका करण्यात आली आहे.**

**वर नमुद वाहनांचे चालक आणि मालक आरोपीतांच्या विरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, महा. पशु संरक्षण अधिनियम,मोटर वाहन अधिनियम, अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या देशी, मोहाफुल दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई ९ आरोपी विरूध्द गुन्हे नोंद एकुण १७,५८५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०१/०६/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन जलालखेडा , खापा, देवलापार,कळमेश्वर, सावनेर आणि आरोली अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू,मोहाफुल दारू, विदेशीदारू असा एकुण १७,५८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.९ आरोपीतांवर ९ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने